नि-11

नेवासा येथील मे.ज्युडि.मॅजि.साहेब वर्ग-1

क्रि.चौ.अ.नं. यांचे कोर्टात

59/2024

<u>अर्जदार</u>

ज्योति किरण ससे, वगैरे

<u>सामनेवाला</u>

किरण तुकाराम ससे, वगैरे

**<u>याकामी अर्जदारातर्फे अंतरीम पोटगी मिळणेसाठी अर्ज खालीलप्रमाणे :</u>**

1. अर्जदारांनी मुळ अर्ज सा.वालेविरुध्द अंतरीम पोटगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जदार नं.1 व सा.वाला नं.1 हे पती पत्नी असून त्यांना त्यांचे लग्नसंबंधातून अर्जदार नं.2 आराध्या ही मुलगी झालेली आहे. अर्जदार नं.1 हिचे लग्न सा.वाला नं.1 बरोबर हिंदु धर्म व जाती रिवाजाप्रमाणे मौजे महालक्ष्मी हिवरे, ता.नेवासा येथे अर्जदार नं.1 चे वडिलांचे घरासमोर दिनांक 06/03/2016 रोजी झालेले आहे. सदर लग्नाचा संपूर्ण खर्च अर्जदार नं.1 चे वडिलांनी केलेला आहे. सदर लग्नात सा.वाले यांना संपूर्ण मानपान व हुंडा म्हणून तीन तोळे सोने व विविध संसार उपयोगी साहित्य देऊन अर्जदार नं.1 चे आईवडिलांनी लग्न मोठया थाटामाटात लग्न करुन दिलेले आहे. तेव्हापासून अर्जदार नं.1 व सा.वाला नं.1 यांचेत पवित्र असा पती पत्नीचा नातेसंबंध निर्माण झालेला आहे. तो आजतागायत कायम आहे. सा.वाला नं.2 व 3 हे अर्जदार नं.1 सासूसासरे आहेत. तसेच अर्जदार नं.2 व 3 यांना अर्जदार नं.1 शिवाय आणखी एक मुलगा अमोल तुकाराम ससे हा होता. तो सन 2016 मध्ये मयत झाला असून त्याची पत्नी सुनिता अमोल ससे ही सासरीच

O.S. to say
16/7/24
2nd JMFC

मुलांसह राहते व त्यांचे सर्वांसह अर्जदार नं.1 ही एकाच घरात राहत होती.

२. लग्नानंतर अर्जदार नं.1 ही सा.वाल्यांकडे मौजे शिंगवे केशव, ता.पाथर्डी येथे नांदण्यास गेली. अर्जदार नं.1 ही सा.वाले यांचेकडे नांदण्यास गेल्यानंतर काही काळ सा.वाले यांनी बऱ्यापैकी नांदविले. परंतू सन 2016 मध्ये अर्जदार नं.1 ही अर्जदार नं.2 या मुलीचे वेळी गरोदर असतांना सा.वाले हे म्हणू लागले की, आम्हाला मुलगा हवा आहे, आमच्या प्रॉपर्टीला आम्हाला वारस पाहिजे, मुलगी झाली तर आम्ही आमच्या मुलाचे दुसरे लग्न करुन देऊ असे बोलून अर्जदार नं.1 हिला मनोमन दुख होईल असे बोलत असत. त्यानंतर अर्जदार नं.1 हिची प्रसुतीची तारीख जवळ आल्याने ती माहेरी आली व दि.25/05/2017 रोजी तिने अर्जदार नं.2 या मुलीस जन्म दिला. मुलगी झाल्याबाबतची माहिती अर्जदार नं.1 चे वडिलांनी फोनद्वारे सा.वाले यांना सांगितली परंतू त्यांचेपैकी कुणालाही आनंद झाला नाही. तसेच अर्जदार नं.1 ला किंवा लहान मुलीला कुणीही भेटण्यासाठी आले नाही. उलट ते अर्जदार नं.1 व 2 या दोघींचाही तिरस्कार करु लागले. त्यानंतर मुलगी दोन महिन्याची झाल्यानंतर अर्जदार नं.1 ने सा.वाला नं.1 ला सांगितले की, आम्हाला घ्यायला या तेव्हा त्याने सांगितले की, मी घरी विचारुन सांगतो. परंतू आठ दिवस उलटून गेले तरीही सा.वाला नं.1 ने अर्जदार नं.1 ला संपर्क केला नाही. त्यामुळे अर्जदार नं.1 ही सप्टेंबर 2017 मध्ये मुलीसह तिचे वडिलांसोबत सासरी नांदण्यास गेली. अर्जदार नं.1 ही सासरी नांदण्यास गेल्यानंतर घरामध्ये कुणीही तिचेशी बोलत नव्हते,

तिचे मुलगी आजारी पडली किंवा अर्जदार नं.1 ही आजारी पडली तर त्यांना दवाखान्यात घेऊन जात नसत तसेच सा.वाला नं.1 हा अर्जदारांबरोबर एका खोलीत न झोपता घराबाहेर झोपत असत. तेव्हा अर्जदार नं.1 ही स्वत:हून सगळयांशी बोलत असत परंतू सा.वाले हे तिला उलटून बोलत असत. रात्रीच्या वेळी सा.वाला नं.1 ही बेडरुम मुलीसह एकटीच असल्याने तिला भिती वाटत असत. त्यामुळे अर्जदार नं.1 ही सा.वाला नं.1 यास सांगत असे की, तुम्ही बेडरुममध्ये आमचसोबत झोपत जा, आम्हाला एकटे सोडून तुम्ही बाहेर का झोपता असे बोलल्याचा सा.वाला नं.1 यास राग येत असत व त्यावरुन तो अर्जदार नं.1 हिला मारहाण करीत असत. येनकेनप्रकारे अर्जदार नं.1 हिला त्रास दिला तर ती मुलीला घेऊन माहेरी निघून असा त्यामागचा सा.वाले यांचा उद्देश होता. परंतू अर्जदार नं.1 ही सा.वाल्यांचा सर्व त्रास सहन करुन नांदत असल्याने सा.वाले यांना त्यांचे उद्देशात सफल होता आले नाही. त्यामुळे सा.वाले हे म्हणू लागले की, तू तुझ्या आईवडिलांशी फोनवर बोलायचे नाही, मुलगी रडत असली तरी तिला सोडून घरातील व शेतातील सर्व कामे करायची व नंतर मुलीला प्रेम करायचे, आम्हाला त्या मुलीशी काही देणे घेणे नाही. तेव्हा अर्जदार नं.1 हिने सा.वाले यांना समजावून सांगितले की, मला मुलगी झाली त्यात माझं काय दोष आहे, पुढे भविष्यात मुलगा पण नाही, तुम्ही माझ्‍ यासोबत असे वागू नका असे बोलल्याचा त्यांना राग आला व ते परत अर्जदाराचा टोचून बोलणे, तिचेशी बोलणे बंद करणे असे प्रकार करु लागले. या सर्व प्रकारामुळे अर्जदार नं.1 हिला खुप शारिरिक व मानसिक त्रास होत असत. परंतू आईवडिलांचे

राहते घरी राहण्यास तयार आहे. त्यासाठी त्यांचेकडून अर्जदाराचे संरक्षणाची हमी बॉण्ड घेणे गरजेचे आहे. तसेच त्यासाठी संरक्षण अधिकारी नेमणे गरजेचे आहे.

7. सा.वाले नं.1 सधन बागायतदार असून त्याचे व त्याचे कुटुंबियाचे नावे 17 ते 18 एकर शेती आहे. शेती व्यवसायापासुन व दुध धंदयापासुन व ट्रॅक्टरच्या धंदयापासुन तसेच कांदा पिकापासून जवळपास 7 ते 8 लाखाचे उत्पन्न वर्षाकाठी निघत आहे. सदर सा.वाला हा अर्जदार नं.1 व 2 यांना किमान महीन्याला 20 ते 25 हजार रुपये अन्न, वस्त्र, पोटगी म्हणुन देवू शकतात. सामनेवाला नं.1 याच्यावर कुणीही अवलंबुन नाही तो चैनीत व मजेत जीवन कंठीत आहे. उलटपक्षी अर्जदारांची अबाळ होऊन उपासमार होत आहे.

8. **<u>अर्जदारांची विनंती की,</u>**

या अर्जाचा निकाल लागेपावेतो अर्जदारांना सा.वालेकडून दरमहा एकत्रित 20,000/- रुपये अंतरीम पोटगी देण्याचा हुकुम व्हावा, हि विनंती.

सोबत ॲफिडेव्हिट दिले आहे, अर्ज मंजूर व्हावा हि विनंती.

ज्योति

**नेवासा**

**दिनांक :-16 /07/2025**

**अर्जदार नं.1 स्वत:साठी व**

**नं.2 ची अ.पा.क. म्हणून**

**अर्जदारातर्फे ॲडव्होकेट**

**(ॲड.भताने जी.यू.)**

नि-12

//ॲफिडेव्हिट//

नेवासा येथील मे.ज्युडि.मॅजि.साहेब वर्ग-1

क्रि.चौ.अ.नं. यांचे कोर्टात

59/2024

अर्जदार

ज्योति किरण ससे, वगैरे

सामनेवाला

किरण तुकाराम ससे, वगैरे

याकामी मी ज्योति किरण ससे, वय : 27, धंदा : काही नाही, ह.मु. द्वारा राजेंद्र रामदास मिमसे, रा.महालक्ष्मी हिवरे, ता.नेवासा, जि.अहमदनगर सत्यप्रतिज्ञेवर ॲफिडेव्हिट करतो की,

1. अर्जदारांनी मुळ अर्ज सा.वालेविरुध्द अंतरीम पोटगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जदार नं.1 व सा.वाला नं.1 हे पती पत्नी असून त्यांना त्यांचे लग्नसंबंधातून अर्जदार नं.2 आराध्या ही मुलगी झालेली आहे. अर्जदार नं.1 हिचे लग्न सा.वाला नं.1 बरोबर हिंदु धर्म व जाती रिवाजाप्रमाणे मौजे महालक्ष्मी हिवरे, ता.नेवासा येथे अर्जदार नं.1 चे वडिलांचे घरासमोर दिनांक 06/03/2016 रोजी झालेले आहे. सदर लग्नाचा संपूर्ण खर्च अर्जदार नं.1 चे वडिलांनी केलेला आहे. सदर लग्नात सा.वाले यांना संपूर्ण मानपान व हुंडा म्हणून तीन तोळे सोने व विविध संसार उपयोगी साहित्य देऊन अर्जदार नं.1 चे आईवडिलांनी लग्न मोठया थाटामाटात लग्न करुन दिलेले आहे. तेव्हापासून अर्जदार नं.1 व सा.वाला नं.1 यांचेत पवित्र असा पती पत्नीचा नातेसंब्रंध निर्माण झालेला आहे. तो आजतागायत कायम आहे. सा.वाला नं.2 व 3 हे अर्जदार नं.1 सासूसासरे आहेत. तसेच

Seen & filed
2nd JMFC

सहा. अधीक्षक
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
नेवासा

नैतिक जबाबदारी असताना देखील जाणूनबुजून ते अर्जदारांचा सांभाळ करण्यास नकार देत आहेत.

6. सध्याचे महागाईचे दिवसात सा.वालेने अर्जदाराचे राहण्याची व उपजिविकेचे अन्न, वस्त्राची व्यवस्था करणे गरजेचे असून तशी सा.वाला नं.1 ची जबाबदारी आहे. अर्जदार ही सा.वाल्याचे राहते घरी राहण्यास तयार आहे. त्यासाठी त्यांचेकडून अर्जदाराचे संरक्षणाची हमी बॉण्ड घेणे गरजेचे आहे. तसेच त्यासाठी संरक्षण अधिकारी नेमणे गरजेचे आहे.

7. सा.वाले नं.1 सधन बागायतदार असून त्याचे व त्याचे कुटुंबियाचे नावे 17 ते 18 एकर शेती आहे. शेती व्यवसायापासुन व दुध धंदयापासुन व ट्रॅक्टरच्या धंदयापासुन तसेच कांदा पिकापासून जवळपास 7 ते 8 लाखाचे उत्पन्न वर्षाकाठी निघत आहे. सदर सा.वाला हा अर्जदार नं.1 व 2 यांना किमान महीन्याला 20 ते 25 हजार रुपये अन्न, वस्त्र, पोटगी म्हणुन देवू शकतात. सामनेवाला नं.1 याच्यावर कुणीही अवलंबुन नाही तो चैनीत व मजेत जीवन कंठीत आहे. उलटपक्षी अर्जदारांची अबाळ होऊन उपासमार होत आहे.

8. **अर्जदारांची विनंती की,**

या अर्जाचा निकाल लागेपावेतो अर्जदारांना सा.वालेकडून दरमहा एकत्रित 20,000/- रुपये अंतरीम पोटगी देण्याचा हुकुम व्हावा, हि विनंती.

येणेप्रमाणे ॲफिडेव्हिट असे.

नेवासा

ज्योती

**दिनांक :-16/07/2025** **ॲफिडेव्हिट करणार**

नेवासा येथील मे. ज्युडी. मॅजी. वर्ग १ साहेब यांचे कोर्टात

अर्जदार

कि. चौ. नं. सौ. ज्योती किरण ससे

५९ /२०२४

सामनेवाले

किरण तुकाराम ससे

या कामी अर्जदार यांच्या अर्जावर सामनेवाले नं. १ यांचे तर्फे लेखी म्हणणे/ कैफीयत खालीलप्रमाणे असे.

१)अर्जदार यांनी दाखल केलेला सदरचा अर्ज योग्य नाही बरोबर नाही सामनेवाला यांना मान्य नाही कबुल नाही.

२)अर्जदार यांनी आपल्या संपुर्ण अर्जातील कथन मनाने जडणघडण करून तयार केलेले आहे. अर्जदार यांनी मे. कोर्टाची दिशाभुल करणेसाठी खोटया तक्रारी केलेल्या आहेत. सत्य परीस्थीती न मांडता अर्जदार हे सदरचा अर्ज मंजुर करून घेणेसाठी खोटे कथन करत आहेत.

Read & recorded

16/4/24

end JMFC

३)अर्जदार यांचे संपुर्ण अर्जातील कथन व विनंती ही पुर्णपणे खोटी बनवाबनवीची मनाने तयार केलेली असलेने सदरचा अर्जदारांचा अर्ज रद्द होणेस पात्र असुन सदरचा अर्ज रद्द व्हावा हि विनंती.

४)अर्जदार यांचे अर्जातील कथन कि "

अर्जदार नं. १ व सामनेवाले नं. १ हे पतीपत्नी असुन अर्जदार नं. २ ही त्यांची मुलगी आहे अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह महालक्ष्मी हिवरे ता. नेवासा येथे दिं. ०६/०३/२०१६ रोजी अर्जदाराचे वडीलांचे खर्चाने पार पडला ,लग्नाचा खर्च अर्जदाराचे वडील यांनी केला,तीन तोळे सोने व मानपान देवुन मोठया धाटामाटात लग्न करून दिले,तुकाराम ससे यांना आणखी १ मुलगा होता तो मयत झालेला आहे अर्जदार हि लग्नानंतर सासरी केशव शिंगवे ता. पाथर्डी येथे नांदण्यास गेली असता काही काळ बरे नांदवले ,परंतु अर्जदार नं. २ यां मुलीचे वेळी गरोदर असतांना सन २०१६ साली आम्हाला मुलगा हवा आहे आम्हाला प्रॅापर्टीला वारस हवा आहे मुलगी झाली दुसरे लग्न करू असे म्हणत असे अर्जदार नं. १ ही बाळंतपणासाठी माहेरी आली ,दिं. २५. ५. २०१७ रोजी अर्जदार नं. २ ही झाली फोन केला कोणीही आले नाही तिरस्कार करू लागले मुलगी दोन महिन्याची झालेनंतर नेण्यास सांगीतले आले नाही, सप्टेबर २०१७ मध्ये मुलीसह अर्जदार नांदण्यास गेली कोणीही बोलत नसे आजारी पडल्यावर दवखान्यात नेत नसे सामनेवाले नं. १ हा अर्जदार नं. १ सह